**नि. दि. दा. क्र. ६१/२०२१ मधील नि. ७३ वरील आदेश**
**( श्रीमती. कमल येसुमाळी वि. शंकर नांदणीकर वगैरे )**

१. प्रस्तुतच्या अर्जान्वये प्रतिवादी नं. ४ यांनी त्यांच्याविरूध्द दि.०९/०७/२०२१ रोजी झालेला " दावा एकतर्फा" चालवणेचा आदेश रद्दबातल करुन मागितला आहे.

२. प्रतिवादीच्या अर्जामधील कथन असे की, प्रतिवादी हे मिलिटरीमध्ये पुण्यात नोकरीस असल्यामळे त्यांना याकामी हजर होता आले नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादीने जाणुनबुजुन कोणताही विलंब केला नाही. त्यामुळे एकतर्फा आदेश रद्दबातल झालेस वादीचे काही नुकसान होणार नसून दावेचा गुणावगुणावर निकाल होणेस मदत होणार आहे. सबब अर्ज मंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी हिने केलेली आहे.

३. वादीने प्रतिवादीचा अर्जास हरकत घेतलेली नाही.

४. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीच्या वकीलांना ऐकले. त्यामुळे प्रतिवादीने विलंबाबाबत दिलेले कारण याठिकाणी योग्य व संयुक्तीक वाटते. अर्ज मंजूर केल्याने प्रतिवादीचा बचाव रेकॉर्डवर येवून वादातील प्रश्नाची गुणावगुणावर निर्णिती करण्यास न्यायालयास मदत होणार असून नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करून प्रतिवादीचा अर्ज खर्चाशिवाय मंजूर करणे योग्य होईल. सबब हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्वाक्षरीत/–

मिरज. ( यु. पी. कोळी )

दि. २६/०८/२०२१ २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.C. Patil (Grade-III) |
| Court | : | II$^{nd}$ Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 26/08/2021 |
| Judgment/Order uploaded on | : | 26/08/2021 |